खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०६ | अंक : ३३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१६ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# सप्टेंबरच्या शेवटच्या दिवसांत महाराष्ट्रात मुसळधार पाऊस : पंजाबराव डख

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, मुंबई :** महाराष्ट्रात ऑगस्ट महिना आणि सप्टेंबरच्या पहिल्या दोन आठवड्यात अपेक्षित पाऊस पडला नाही. पण १४ सप्टेंबरला राज्यभरात गणेशोत्सवाला सुरुवात झाली. गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला राज्यभरात विविध जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली.

त्यामुळे राज्यातील शेतकरी सुखावला आहे. असं असलं तरी राज्यात मुसळधार पाऊस पडताना दिसत नाही. पण आता मुसळधार पावसाची प्रतिक्षादेखील पुढच्या काही दिवसांत संपणार असल्याचा दावा हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी केला आहे. सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवसांत राज्यभरात मुसळधार पावसाची शक्यता





असल्याचा अंदाज डख यांनी वर्तवला आहे.

**१६ सप्टेंबरला कसा पाऊस पडणार?**

१६ सप्टेंबरला विखुरलेल्या स्वरुपाचा पाऊस पडेल. १७ आणि १८ सप्टेंबरला पावसात थोडी वाढ होईल. मुंबई, पुण्यातही या दोन दिवसांत पाऊस पडेल. त्यानंतर १९ ते २४ सप्टेंबरच्या पावसाचे आगमन दक्षिण महाराष्ट्रातून होईल. ज्या भागांमध्ये अद्याप अपेक्षित पाऊस पडलेला नाही तिथे पाऊस पडणार आहे, अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली.

**दुष्काळाला तोंड देण्यासाठी सरकारची तयारी सुरु**

दरम्यान, राज्य हवामान विभागाकडून पुढच्या चार दिवसांसाठी कोणत्याही जिल्ह्याला पावसाचा रेड, ऑरेंज किंवा यलो अलर्ट जारी करण्यात आलेला नाही. त्यामुळे पुढच्या चार दिवसांत अपेक्षित पावसाची शक्यता कमी आहे. पण पंजाबराव डख यांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार पुढच्या चार ते पाच दिवसांत राज्यात विखुरलेल्या स्वरुपात पाऊस पडेल. हा पाऊस फार कमी वेळासाठी पडेल. पण तो विविध ठिकाणी पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, सध्याची पावसाची परिस्थिती पाहता दुष्काळाला तोंड देण्यासाठी सरकारची तयारी सुरु झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

**१९ ते २४ सप्टेंबर चांगल्या पावसाची शक्यता...**

राज्यात १७ आणि १८ सप्टेंबरला बऱ्याच भागांमध्ये जोरात पाऊस पडणार आहे. दक्षिण महाराष्ट्र, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात १९ ते २४ सप्टेंबर दरम्यान पाऊस पडणार आहे. सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, पुणे, बारामती, दौंड, मानखटाव, इंदापूर, बीड, आष्टी, जाम खेड, कर्जत, धाराशिव, लातूर, बीड, नांदेड, परभणी, जालना या भागांमध्ये १९ ते २४ सप्टेंबर काळात पाऊस पडेल. दक्षिणेकडे बाष्प सक्रिय झाल्यामुळे वातावरण तयार होईल. तिथून हा पाऊस सुरु होऊन राज्यातील इतर भागांकडे जाईल. हा पाऊस विदर्भात आणि उत्तर महाराष्ट्रातही राहील, अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली.

**'२६ ते ३० सप्टेंबर मुसळधार पावसाची शक्यता'**

२४ सप्टेंबरनंतर विशाखापट्टन येथे समुद्रात एक कमी दाबाचा पट्टा निर्माण होणार आहे. त्याचे रुपांतर चक्रीवादळात होणार आहे. त्यामुळे २६ ते ३० सप्टेंबरपर्यंत महाराष्ट्रात पाऊस येणार आहे. हा पाऊस महाराष्ट्रात धुमाकूळ घालणार आहे. सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यातील पाऊस शेतकऱ्यांना तारणारा पाऊस असणार आहे, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.

## कुणाचेही फोन आले तरी हातगाड्यांवरील कारवाई थांबवू नका, महापालिका आयुक्तांचे आदेश

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, छत्रपती संभाजीनगर :** शहरातील कोणत्याही रस्त्यांवर हातगाड्यांमुळे अडथळा येत असेल. अनधिकृत हातगाड्यांवर कारवाई करताना कुणाचेही फोन आले तर कारवाई थांबवू नका. कुणाचे फोन आले तर त्याची नोंद घ्या. कारवाईला विरोध करणे म्हणजे कायद्याला विरोध करणे आहे, असे कुणी करत असेल तर तक्रार करा, कारवाई करू, असा इशारा महापालिका आयुक्त अमोल येडगे यांनी दिला.

महापालिकेची तहकूब स्थायी समिती सभा मंगळवारी सभापती अनिल मकरिये यांच्या अध्यक्षतेखाली झाली. नगरसेवक राजगौरव वानखेडे यांनी शहरातील हातगाड्यांचा मुद्दा उपस्थित केला. शहरातील सर्वच प्रमुख, व्हीआयपी रस्त्यांवर हातगाड्या बिनधास्तपणे उभ्या आहेत. दिल्ली गेट, हर्सूल टी पॉइंट, लेबर कॉलनी या व्हीआयपी रस्त्यावर हातगाड्या उभ्या केल्या जातात, असं नगरसेवक वानखेडे म्हणाले.

**नगरसेवक वानखेडे आणखी काय म्हणाले?**

महापालिकेने मागे केलेल्या नोंदीनुसार नोंदणीकृत हातगाड्यांची संख्या १४ हजार आहे. प्रत्यक्षात आता शहरात त्यापेक्षा कितीतरी जास्त हातगाड्या आहेत. त्याच्या नोंदी महापालिकेकडे नाहीत, अनधिकृत हातगाड्या कुठेही उभ्या केल्या जातात. त्यामुळे वाहतुकीला तर अडथळा येतो, असं त्यांनी सांगितलं.

एकीकडे महापालिकेचे अतिक्रमण हटाव पथक कारवाई करत नाही म्हणून ओरडायचे आणि दुसरीकडे कारवाई सुरू असेल तर हातगाडी सोडण्यासाठी फोन करायचे. हे दुटप्पी धोरण असू नये. सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधींनी हातगाड्यांवरील कारवाईस सहकार्य केले पाहिजे. यासाठी पालिकेने एक टास्क फोर्स तयार करावा. त्यात ठराविक संख्येने मनुष्यबळ असावे. सायंकाळी चार ते नऊ या कालावधीत जर कारवाई मोहीम राबवता येऊ शकेल. रस्ते अतिक्रमणमुक्त करून साफ करा, असे वानखेडे यांनी




सुचवले.

**महापालिका आयुक्त नेमकं काय म्हणाले?**

त्यावर महापालिका आयुक्त अमोल येडगे म्हणाले की, फेरीवाला धोरणाबाबत पुढील महिनाभरात निश्चितपणे निर्णय होईल. तोवर अतिक्रमण हटाव विभागाने कुठल्या भागात हातगाड्यांची अडचण आहे त्याची नोंद घ्या, कारवाई करा. या दरम्यान कुणाचे फोन आले तर कारवाई थांबवू नका. विरोध करणे म्हणजे कायद्याला विरोध करणे, कुणाचा फोन आला तर त्याची तक्रार करा, निश्चितपणे नियमानुसार कारवाई केली जाईल. फेरीवाला धोरण निश्चित झालेले नाही. आतापर्यंत फ ेरीवाला संघटनेच्या निवडणुकीमुळे राहिले होते. निवडणुका पार पडल्या, मात्र प्रश्न न्यायप्रविष्ट आहे. या प्रकरणाचा चांगला फॉलोअप घ्या, आपली बाजू मांडा, अशा सूचना आयुक्तांनी विधी अधिकारी अपर्णा थेटे यांना दिल्या.

## कोराडी रोड मंदिर परिसरात गुंडांचा उच्छाद

### महिलेच्या पानठेल्याची तोडफोड !

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** कोराडी देवी मंदिर रोड परिसरात स्वतःच्या हक्काच्या जागेवर पानठेला चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या एका होतकरू महिलेच्या पानठेल्यावर काही गुंडांनी धुडगूस घालत तोडफोड केल्याची धक्कादायक घटना १३ सप्टेंबर रविवारला रात्री १०.३० वाजताच्या सुमारास घडली. या घटनेमुळे स्थानिक व्यावसायिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली असून सर्वसामान्य नागरिकांच्या आणि महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार सदर महिला नेहमीप्रमाणे आपल्या पानठेल्यावर असताना तीन ते चार गुंड तिथे आले, त्यांनी सुरुवातीला सिगारेटची मागणी केली काही वेळातच विनाकारण अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढवत गुंडांनी महिलेला धक्काबुक्की केली व ठेल्यातील सर्व साहित्याची तोडफोड करत सामान अस्तव्यस्त फेकून दिल्याची माहिती खात्रीलायक सूत्रांनी दिली आहे.

घटनेच्या वेळी महिलेचा पती उपस्थित होता मात्र, गुंडांची दहशत पाहून पती–पत्नीने जीव वाचवण्यासाठी उघडा पानठेला सोडून घराच्या दिशेने पळाले त्यानंतर पीडित दांपत्याने तातडीने ११२ या क्रमांकावर पोलिसांशी संपर्क साधला.

माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले व दांपत्याला सोबत घेऊन पानठेल्यावर पोहोचले मात्र तोपर्यंत गुंडांनी पानठेल्यातील सर्व साहित्याचे मोठे नुकसान केले होते.

या प्रकारामुळे दांपत्य कमालीचे दहशतीखाली आले आहे. पोलिसांनी पीडित महिलेला अधिकृत तक्रार नोंदवण्यास सांगितले मात्र गुंडांच्या भीतीने महिलेने तक्रार देण्यास नकार दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन खापरखेडा पोलिसांनी धुडगूस घालणाऱ्या एका गुंडाला ताब्यात घेतल्याची आहे. मात्र या प्रकरणातील उर्वरित आरोपी अजूनही मोकाट आहेत पोलीस त्यांचा शोध घेणार का? असा प्रश्न उपस्थित झाला असून, कठोर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

## गणेश विसर्जन मिरवणुकांमध्ये डॉल्बी, लेझर लाईट आणि केमिकल स्प्रेवर बंदी

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.१५ : पनवेल (रायगड) :** गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुका शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पडाव्यात, तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी प्रतिबंधात्मक अधिसूचना जारी केली आहे. त्यानुसार १९ सप्टेंबर २०२६ रोजी होणाऱ्या सहाव्या दिवसाच्या तसेच २५ सप्टेंबर रोजी होणाऱ्या अनंत चतुर्दशीच्या गणेश विसर्जन मिरवणुकांमध्ये डॉल्बी, डीजे साऊंड सिस्टीम, तीव्र क्षमतेचे लेझर बीम लाईट, स्नो स्प्रे आणि केमिकल स्प्रे यांच्या वापरावर प्रतिबंध घालण्यात आला आहे.



गणेशोत्सवाच्या काळात विसर्जन मिरवणुकांमध्ये मोठ्या प्रमाणावर ध्वनिक्षेपक, डीजे आणि विविध प्रकारच्या प्रकाशयंत्रणांचा वापर केला जातो. मात्र, मोठ्या आवाजामुळे ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न निर्माण होण्यासोबतच नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि विविध आरोग्यविषयक समस्या असलेल्या नागरिकांना मोठ्या आवाजाचा त्रास होऊ शकतो. याशिवाय तीव्र क्षमतेच्या लेझर बीम लाईट मुळे डोळ्यांना इजा होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने त्यावरही प्रतिबंध घातला आहे.

विसर्जन मिरवणुकांमध्ये मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होत असतात. त्याचबरोबर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या प्रमाणावर बंदोबस्तासाठी तैनात केले जातात. मिरवणुकीदरम्यान वापरण्यात येणाऱ्या तीव्र लेझर लाईट मुळे नागरिकांसह बंदोबस्तावर असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या डोळ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी मिरवणुकीचे आयोजन करताना नागरिकांच्या आरोग्याची आणि सुरक्षेची विशेष काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पनवेल तालुक्यातही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात असून विविध भागांत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून विसर्जन मिरवणुकांचे आयोजन करण्यात येते. या पार्श्वभूमीवर संबंधित मंडळांनी प्रशासनाने जारी केलेल्या आदेशांची माहिती घेऊन त्यानुसार मिरवणुकीचे नियोजन करणे आवश्यक आहे. ध्वनिक्षेपक, डीजे, लेझर लाईट तसेच प्रतिबंधित स्प्रेच्या वापराबाबत स्थानिक पोलीस प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याची गरज आहे.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अन्वये ही प्रतिबंधात्मक अधिसूचना जारी करण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन करून गणेश विसर्जन मि रवणुकीमध्ये डॉल्बी, डीजे साऊंड सिस्टीम, तीव्र क्षमतेचे लेझर बीम लाईट, स्नो स्प्रे किंवा केमिकल स्प्रे वापरताना आढळून आल्यास संबंधित व्यक्ती, संस्था, गणेशोत्सव मंडळ अथवा संचालकांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ अन्वये दंडनीय कारवाई करण्यात येणार आहे.

गणेश विसर्जन मिरवणुका उत्साहात साजऱ्या करताना ध्वनी आणि प्रकाशप्रदूषण टाळणे, नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि प्रशासनाच्या प्रतिबंधात्मक आदेशांचे पालन करणे, ही जबाबदारी गणेशोत्सव मंडळांसह नागरिकांवरही राहणार आहे. त्यामुळे पनवेल तालुक्यातील गणेशोत्सव मंडळांनी विसर्जन मिरवणुका शांततेत आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## दुर्गापुरात डीजेवर कारवाई, १३.५० लाखांचा मुद्देमाल जप्त



**दि.१५, चंद्रपूर :** जिल्ह्यात डीजे वाजविण्यावर बंदीचे आदेश असतानाही ठिकठिकाणी या आदेशाचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूम ीवर चंद्रपूर जिल्हा पोलीस दलाकडून विनापरवाना तसेच कर्णकर्कश आवाजात डीजे वाजविणाऱ्यां विरुद्ध कारवाईची मोहीम सुरू आहे. याच मोहीमेअंतर्गत दुर्गापूर पोलिसांनी धडक कारवाई करत तब्बल १२३.०५ डेसिबल आवाजाची नोंद झालेल्या डीजेवर कारवाई केली. या कारवाईत वाहनासह सुमारे १३.५० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दि.१४ सप्टेंबर २०२६ रोजी दुर्गापूर पोलीस ठाण्याचे पथक पेट्रोलिंगवर असताना कोंडी वार्ड क्रमांक ६, ऊर्जानगर, नेरी येथे गणेश आगमन मिरवणुकीत अत्यंत तीव्र आवाजात डीजे वाजविला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे, पोलीस निरीक्षक शेगावकर यांनी संबंधित डीजेची ध्वनीमापक यंत्राद्वारे तपासणी केली असता, आवाजाची तीव्रता १०५.५ डेसिबल असल्याचे आढळून आले. यावेळी संबंधितास पंचांसमक्ष आवश्यक सूचना देण्यात आल्या. मात्र, त्यानंतरही संबंधित इसमाकडून पुन्हा मोठ्या आवाजात डीजे वाजविला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलीस हवालदार भोयर आणि पोलीस शिपाई हरीश तलांडे हे ध्वनीमापक यंत्र व पंचांसह घटनास्थळी दाखल झाले. यावेळी डीजेचा आवाज क्षमतेपेक्षा अधिक कर्णकर्कश असल्याचे निदर्शनास आले. पंचांसमक्ष ध्वनीमापक यंत्राद्वारे पुन्हा तपासणी केली असता आवाजाची तीव्रता तब्बल १२३.०५ डेसिबल इतकी नोंदविण्यात आली. पोलिसांनी डीजे वाजविण्याचा परवाना मागितला असता संबंधिताने आपल्याकडे कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. जिल्हा पोलीस अधीक्षकांनी म हाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३८ अन्वये आदेश जारी केलेले असतानाही त्याचे उल्लंघन केल्या प्रकरणी पोलिसांनी पंचांसमक्ष जप्ती पंचनामा करून डीजेचे साहित्य व वाहन ताब्यात घेतले. या प्रकरणातील डीजे चालक अमन गंगाधर गोहणे (रा. बाबराळा, ता. मुल,जि.चंद्रपूर), याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १३६ व ७० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अक्षराज






## निसर्गकवी ना. धो. महानोर

मराठी साहित्यातील अनमोल रत्न, निसर्गकवी ना. धो. महानोर यांची आज जयंती. निसर्गकवी ना. धो. महानोर यांचा जन्म १६ सप्टेंबर १९४२ रोजी पळसखेडे येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे आई-वडील शेतमजूर होते. दुसऱ्याच्या शेतात जाऊन ते राबत असत. ना. धो. महानोरांना चार भाऊ व तीन बहिणी होत्या. त्यात ते सर्वांत थोरले होते.

त्यांचे प्राथमिक शिक्षण गावातच झाले; मात्र माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी त्यांना शेंदुर्णीच्या शाळेत जावे लागले. शेंदुर्णीची शाळा गावापासून दहा-बारा किलोमीटर अंतरावर होती. दहा-बारा किलोम ीटर पायी चालत जाऊन ते शाळेत जात. शाळेत असतानाच त्यांना कवितेची गोडी लागली. शाळेत असतानाच ते कविता करू लागले. लहानपणापासूनच त्यांना शेत, शिवार आणि निसर्ग यांची आवड होती. त्यामुळे ते त्यावरच कविता करत. लहानपणी लागलेली कवितेची गोडी पुढेही कायम राहिली.

मॅट्रिक पास झाल्यावर ते जळगावला उच्च शिक्षण घेण्यासाठी गेले. तिथे त्यांनी मुळजी जेठा महाविद्यालयात कला शाखेत प्रवेश घेतला. तिथे त्यांची काव्यप्रतिभा बहरली. त्यांच्यात असलेली काव्यप्रतिभा ओळखून महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांना प्रोत्साहन दिले. दुर्दैवाने घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना उच्च शिक्षण अर्ध्यावर सोडून घरी परतावे लागले. घरी आल्यावर ते शेतीत रमले. शेतशिवारात राबतच त्यांनी आपल्या कविता करायला सुरुवात केली. शिक्षण थांबले, पण कविता थांबली नाही.

ते शेतशिवारात रमून कविता करू लागले. शेतशिवारात रमणाऱ्या या कवीने आपल्या कवितेतून निसर्गाची अमाप उधळण केली. त्यांच्या अद्भुत निसर्गकवितांनी त्यातल्या रंग-गंधांनी, नदीच्या प्रवाहासारख्या नाद-लयींनी वाचक-रसिकांना वेड लावले. रानात राहणाऱ्या ना. धो. महानोर सरांच्या कवितेचे केंद्रस्थान निसर्ग आणि स्त्रिया होते. निसर्ग आणि स्त्रियांना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी केलेल्या कविता वाचकांच्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या.

त्यांचे एकूण अकरा काव्यसंग्रह प्रसिद्ध असून ‘अजिंठा’ नावाचे खंडकाव्यही प्रकाशित झाले आहे. यादरम्यान त्यांनी गद्यलेखनही सुरू ठेवले. ‘गांधारी’ ही कादंबरी, ‘गपसप’ व ‘गावाकडच्या गोष्टी’ हे लोककथासंग्रह, ‘यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार’, ‘शरद पवार आणि मी’, ‘आनंदयोगी पु. ल.’ ही पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांनी जरी गद्यलेखन विपुल प्रमाणात केले असले, तरी त्यांचे पहिले प्रेम कवितेवरच होते.

त्यांनी अनेक चित्रपटांची गाणीही लिहिली आहेत. ‘जैत रे जैत’ चित्रपटातील त्यांची गाणी तर रसिकांच्या ओठांवर आजही कायम आहेत. ना. धो. म हानोर सर सहा वर्षे विधानपरिषदेचे सदस्य होते. या काळात त्यांनी सभागृहात शेती आणि ग्राम ीण भागातील प्रश्न पोटतिडकीने मांडले आणि ते सोडवण्याचा प्रयत्न केला.

महानोर सरांना अनेक पुरस्कार मिळाले. अगदी पद्मश्रीदेखील मिळाली; मात्र ‘निसर्गकवी’ ही रसिकांनी, वाचकांनी त्यांना दिलेली उपाधी ते सर्व पुरस्कारांपेक्षा श्रेष्ठ मानत. ३ ऑगस्ट २०२३ रोजी निसर्गात रमणारा हा निसर्गकवी सर्वांना सोडून गेला. ना. धो. म हानोर सर जरी कायमचे निघून गेले असले, तरी रसिकांच्या आणि वाचकांच्या मनात ते कायम निसर्गकवी म्हणूनच स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याची मोठी हानी झाली आहे. निसर्गकवी ना. धो. महानोर यांनी आपल्या कवितेतून मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे.

निसर्गकवी ना. धो. महानोर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

# गणरायाची आरती : तरुणाईसाठी जीवनमंत्र



दरवर्षीप्रमाणे श्री गणेशजींचे आगमन झाले.महाराष्ट्राबरोबर संपूर्ण भारतात गणेशोत्सव साजरा होतांना दिसून येतोय. त्यासह गावोगावी अनेक गणेश मंडळ स्थापित झालेली आहेत. अबालवृद्ध या उत्सवात सहभागी होतात.दहा ते अकरा दिवस सकाळ संध्याकाळ बाप्पाची आरती करतात.आपल्या महाराष्ट्रामध्ये साधारण मराठीतील आरती म्हणतात. तर या आरतीचा आधुनिक विचारातून अर्थ लक्षात घेतला तर, या खऱ्या अर्थाने बाप्पाच्या आगमनाचा उत्सव साजरा झाल्याचे समाधान होईल.तरुण पिढीने सण साजरे करण्याबरोबर आपण जीं आरती म्हणतो ती जर खऱ्या अर्थाने समजून घेतली व आचरण केले तर नक्कीच समाजाची पर्यायाने राष्ट्राची उन्नती होईल.चला तर आरतीची पहिली ओवी जसेकि,

**सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची ।**
**नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।।**

आजच्या काळात सुखकर्ता म्हणजे फक्त स्वतः सुखी होणारा नव्हे, तर इतरांच्या आयुष्यातही आनंद निर्माण करणारा माणूस बनायला हवे.दुःखहर्ता म्हणजे गरजू व्यक्तीला मदत करणारा बनायला हवे अर्थात

नवपिढीने आपल्या पासून इतरांना त्रास होणार नाही याची काळजी तर घ्यायला हवीच त्याचंबरोबर समाजातील इतर दुर्बल घटकांना एक सामाजिक माणुसकी लक्षात घेऊन सहकार्याच्या भावनेतून समाजही ताचे उपक्रम राबवून कार्य करायला हवे.आरतीतील दुसरी ओवी अशी कि,

**सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची ।**
**कंठी झळके माळ मुक्ताफळांची ।।** अर्थात बाप्पाच्या संपूर्ण शरीराला शेंदूर लावलेला असून त्याच्या गळ्यात मोत्यांची सुंदर माळ शोभून दिसत आहे.बदलत्या काळानुसार सौंदर्याची संकल्पना वेगवेगळी राहू शकते मात्र खरं सौंदर्य हे साधेपणातच असतं.आज सौंदर्याची व्याख्या केवळ चेहरा, कपडे किंवा सोशल मीडियावरील फोटोपुरती मर्यादित दिसून येत आहे.तर प्रत्येकाच्या ठायी

सुंदर विचार, स्वच्छ आचार, चांगले चारित्र्य आणि संवेदनशील मन असायला हवे.हेच खरे सौंदर्य आहे.बाप्पाच्या आरतीतील धृवपद पुढीलप्रमाणे जसे कि,

**जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।**
**दर्शनमात्रे मनकामना पुरती ।।** याचा अर्थ असा कि,हे मंगलमूर्ती गणराया, तुझा जयजयकार असो. तुझे दर्शन घेतल्याने भक्तांच्या मनातील सद्भावपूर्ण इच्छा पूर्ण होतात आणि मनाला सम ाधान मिळते.हे जरी खरं असलं तरी मात्र

गणपतीबाप्पा समोर आपल्या मनातील इच्छा व्यक्त करतो कि माझ्या मनातील सर्व इच्छा पूर्ण होवो. आणि बाप्पा ती इच्छा पूर्णही करतो पण त्या पूर्ण करण्यासाठी आपल्याठायी प्रयत्न, शिस्त, ज्ञान आणि सातत्य आवश्यक आहे.आजच्या नवपिढीने केवळ मला यश मिळू देअशी प्रार्थना न करता,मला यश मिळवण्यासाठी योग्य सदबुद्धी, सुबुद्धी आणि मेहनतीची शक्ती देअशी प्रार्थना करावी.बाप्पाच्या आरतीतील दुसरी ओवी जशी कि,

**रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा ।**
**चंदनाची उटी कुंकुमकेशरा ।।** याचा सर्वसाधारण अर्थ असा कि,हे गौरीमातेच्या पुत्रा, तुझ्या मस्तकावर रत्नजडित अलंकार शोभत आहेत.अंगाला चंदनाचा लेप आणि कपाळावर कुंकू लावलेले आहे.यातील

रत्नजडित अलंकार आपल्याला एक आधुनिक संदेश देतात.आपल्या जीवनातील खरी संपत्ती कोणती?

पैसा, मोबाईल, गाडी किंवा महागडे कपडे नव्हे; तर ज्ञान, कौशल्य, संस्कार, आरोग्य आणि चांगली माणसं ही जीवनातील खरी संपत्ती आहे.याची जाणीव प्रत्येकाला असायला हवी.बाप्पाच्या आरतीतील पुढील ओवी जशी कि,

**हिरे जडित मुकुट शोभतो बरा ।**
**रुणझुणती नूपुरे चरणी घागरिया ।।** हे गणराया तुझ्या मस्तकावरील हिऱ्यांनी सजवलेला मुकुट अतिशय सुंदर दिसतो. तुझ्या चरणांतील नूपुरांचा मधुर रुणझुण आवाज मनाला आनंद देतो.मुकुट म्हणजे प्रतिष्ठा आणि नूपुर म्हणजे आपल्या वाटचालीची जाणीव.नवपिढीने यश मिळवल्यानंतर अहंकार न करता नम्र राहावे. आपली प्रत्येक पायरी आपल्याबरोबर कुटुंब, समाज आणि देशालाही पुढे घेऊन जाणारी असावी.बाप्पाच्या आरतीतील तिसऱ्या कडव्यातील पहिली ओवी जसे कि,

**लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।।**
**सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।।**

लंबोदर म्हणजे मोठे पोट यातून सहनशीलता आणि सामावून घेण्याची वृत्ती शिकता येते.

आज मानवी स्वभावानुसार वेगवेगळ्या क्षेत्रात मतभेद खूप आहेत, मात्र मनभेद नसावेत. धर्म, जात, भाषा, विचार, राजकीय मत किंवा जीवनशैली वेगळी असली तरी दुसऱ्याचा आदर करणे आवश्यक आहे.मत वेगळे असले तरी मात्र,माणूस एकमेकांचा शत्रू असण्याची गरज नाही.हि वृत्ती प्रत्येक मानवाच्या ठायी असायला हवी.

सरळ सोंड हे सरळपणा व प्रामाणिकपणा प्रामाणिकपणाचे प्रतीक आहे.आजच्या स्पर्धेच्या युगात शॉर्टकट, फसवणूक आणि दिखावा यापेक्षा प्रामाणिक मार्गाने मिळवलेले यश अधिक मौल्यवान आहे. कारण त्यातून आपल्या अंगी असलेल्या संघर्षाची जाणीव होते. बाप्पाच्या आरतीतील विशेषत: वक्रतुंड या शब्दपासून परिस्थितीनुसार मार्ग बदलण्याची बुद्धिमत्ता हि शिकवण मिळते.जग बदलत आहे. तंत्रज्ञान, ए आय , शिक्षण आणि रोजगाराच्या नव्या संधी येत आहेत. त्यामुळे जुन्या पद्धतींना चिकटून न राहता नवे ज्ञान आणि नवी कौशल्ये शिकण्याची तयारी ठेवावी.त्रिनयना अर्थात तीन दृष्टी. भूतकाळातून शिका, वर्तमानात जगा, आणि भविष्याचा विचार करा. हा गुण आपल्याला शिकवयास मि ळतो. अर्थात जीवन जगत असतांना भूतकाळात आपल्या हातून काहि चुका झाल्या असतील तर, चुकांची पुनरावृत्ती टाळावी व वर्तमानकाळात आनंदाने जगावे त्यासह भविष्याचाही विचार करावा ही आपणास नितिमूल्याची शिकवण मि ळते. पुढील ओवी अशी कि,

**दास रामाचा वाट पाहे सदना ।।**

या ओळीतून भक्ती आणि नम्रता आहे दिसून येते.

नवपिढीसाठी मोलाचे मार्गदर्शन असे दिसून येते कि, आपल्याला अथक प्रयत्नातून यश मि ळाले तरी, मुळांशी जोडलेले राहा.आई-वडील, शिक्षक, मित्र, गाव, समाज आणि ज्यांनी आपल्याला घडवले त्यांच्याप्रती कृतज्ञता ठेवणे हीच खरी संस्कृती. येथे आरतीचे रचनाकारांनी स्वतःला दास म्हटले आहे. यातून कवीची नम्रभाव दिसून येतो. बाप्पाच्या आरतीतील अंतिम ओवी जसे कि,

**संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवंदना ।।**

यातून रचनाकारांनी संकटाच्या वेळी माझे रक्षण कर आणि जीवनाच्या अंतिम क्षणीही माझा उद्धार कर. अशी गणराया चरणी मागणे मागितले आहे. संकटात देवाला हाक मारणे ही श्रद्धा आहे; पण संकट टाळण्यासाठी पूर्वतयारी, विवेक आणि ज्ञान वापरणे ही आधुनिक जीवनाची गरज आहे. रस्ते सुरक्षा, पर्यावरण, व्यसनमुक्ती, डिजिटल सुरक्षितता, मानसिक स्वास्थ्य, शिक्षण आणि आर्थिक शिस्त या क्षेत्रांत जागरूक राहणे हीदेखील समाजसेवाच आहे.

मित्रांनो, गणोशोत्सव ही आपली परंपरा आहे मात्र त्याचबरोबर गणपतीचे विचार आचरणात आणणे ही संस्कृती आहे. भारतीय संस्कृती आणि ग्रंथांनुसार भगवान श्री गणेशाला सर्व ६४ कला आणि १४ विद्यांचे अधिपती मानले जाते. म्हणून मूर्तीसमोर आरती करण्याबरोबर एका गरजू विद्यार्थ्याला शिक्षणाची मदत, एका झाडाची लागवड,एका वृद्धाला आधार, एका व्यसनाधीन तरुणाला योग्य मार्ग, एका निराश व्यक्तीला आशेचे दोन शब्द हीदेखील गणेशभक्तीच आहे. गणपतीकडे केवळ इच्छा मागू नका; इच्छा पूर्ण करण्याची बुद्धी मागा. संकट दूर करण्याची प्रार्थना करण्याबरोबर संकटाशी लढण्याचे धैर्य मिळवा आणि स्वतःसाठी सुख मागताना इतरांच्या आयुष्यात सुख निर्माण करण्याचे सामर्थ्य मिळवा. हिच खरी गणपती बाप्पाच्या आरतीतील समस्त मानव प्राण्यासाठी मोलाची शिकवण असेल.

**– श्री. विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि बुलडाणा**
**मो नं ९७६३२८२०७७**

### बाप्पा विघ्नहर्ता !

थाटात येतो
राजा सारखा बसतो,
भक्तांकडे पाहून
गालात हसतो...

पाहताच बाप्पाला
येतो आनंदाचा पूर ,
ढोल ताशा नगाऱ्याचे
गगनाला भिडतात सूर...

थोड्याच दिवसांसाठी बाप्पा
भक्तांना भेटायला येतो,
वर्षभराचा दुरावा एका
क्षणात दूर करतो...

नाजूक त्याचे डोळे
शेला असतो भरजरी,
हिरे जडित मुकुट
पितांबर त्याचा भारी...

वाजत गाजत बाप्पा
मखरात येऊन बसतो,
भक्तांच्या मनात एक
वेगळाच उत्साह दाटतो...

सारा परिसर झगमगतो
लाईट तोरणे सजतात
बाप्पाच्या मंडपात
आरतीचे सूर उमटतात

बाप्पाच्या आगमनाचा
सोहळा रंगतो छान
बाप्पा विघ्नहर्त्याची
वेगळीच असते शान...

**– ज्योती रावराणे,**
**कांजुरमार्ग, मुंबई**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# ब्रिक्स चे फलित – भारताचे ‘हित’



अकरा देशांची संघटना असलेल्या ‘ब्रिक्स’ संघटनेचे दोन दिवसिय संमेलन नुकतेच दिल्लित पार पडले, भारताकडे या संघटनेचे अध्यक्षपद होते आता चीन अध्यक्षता करणार आहे. जागतिक परिस्थिती, आर्थिक संकट, ईराण ईस्त्रायल युद्ध, रशिया – युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर हे संमेलन पार पडले. त्याच बरोबर देशातील महागाई, बेरोजगारी, आर्थिक मंदी याचे देखील सावट या संमेलनावर होते.सध्या अमेरिका आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्या हेकेखोरपणा आणि वर्चस्ववादामुळे अख्खा जगाला वेठीस धरले आहे.

आपल्या दादागिरीने अमेरिकेने नुकतेच व्हेनेझुऐला वर ताबा मिळवला. टेरिफ वॉरच्या निमित्ताने अमेरिका जगातील देशांवर मनमानी करत आहे. २००१ मधे भारत, रशिया, चीन आणि ब्राझील यांनी एकत्र येऊन 'ब्रिक्स' या संघटनेची स्थापना केली, विकसनशील देश आणि ऊभरती अर्थव्यवस्था असलेले देश यांची ही संघटना आहे. २००९ मधे पहिल्यांदा या संघटनेचे शिखर संम्मेलन झाले. कालांतराने २०१० साली दक्षिण आफ्रिका या संघटनेत सामील झाली. आज जगातील ब्राझील, रूस, भारत, चीन, दक्षिण अफ्रीका, मिस्र, इथियोपिया, ईरान, सऊदी अरब, संयुक्त अरब अमीरात और इंडोनेशिया असे अकरा देश या संघटनेचे सदस्य आहेत. दर पाच वर्षांनी रोटेशन पद्धतीने या संघटनेचे अध्यक्षपद सदस्य देशांना दिले जाते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुशल नेतृत्वाखाली ही दोन दिवसिय समिट यशस्वी पार पडली, रशिया, चीन या देशांचे बलाढ्य नेते एकाच व्यासपीठावर आले आणि विशेष म्हणजे या वेळी एक संयुक्त घोषणापत्र जाहीर करण्यात आले, ब्रिक्स संघटनेचे हे अठरावे संमेलन होते. गेल्या काही वर्षांपासून भारताचे परराष्ट्र धोरण, अर्थ निती कुठेतरी चुकते आहे का असे वाटत असतानाच या संमेलनाच्या निमित्ताने भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील भुमिका अधोरेखित होत आहे. जागतिक व्यापारात भारताचा बॅलन्स ऑफ ट्रेड चांगलाच बिघडला आहे केवळ अमेरिके बरोबरच्या व्यापारात आपण फायद्यात होतो मात्र आता अमेरिकेबरोबर होऊ घातलेल्या व्यापारी करारात देखील घाट्याचा सौदा ठरण्याची शक्यता आहे. काही वर्षांपूर्वी ब्रिक्स संमेलनात डॉलर ला पर्याय म्हणून ब्रिक्स देशांची वेगळी करन्सी असावी असे मत व्यक्त केले गेले मात्र अमेरिकेने डोळे वटारताच विषयच मागे पडला. सध्या डॉलर च्या मुकाबल्यात भारतीय रूपयांची घसरण सुरूच आहे आणि त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होच आहे. इराण-ईस्त्रायल युद्धात भारत काहीसा अमेरीका ईस्त्रायल च्या बाजुने असल्याचे चित्र निर्माण झाले आहे मात्र तरीही सर्वाशी संबध अशी भारताची भुमिका आहे. अमेरिकेमुळे भारताला रशिया कडुन तेल खरेदी कमी करावी लागते आहे तर इराणकडुन तेल खरेदी बंद करावी लागली होती.

या सगळ्या पार्श्वभूमीवर झालेली ब्रिक्स समिट चे फलित आणि भारताचे हित काय हे भविष्यातच ठरेल. मात्र चीन ने सीमेवरील तणाव कमी करण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे हे ही नसे थोडके. त्याच वेळी आत्मनिर्भर भारत म्हणत चीन कडुन आयातीम धे मोठी वाढ झाली आहे हे ही तितकेच खरे आहे. भारताची चीनवरील निर्भरता वाढत आहे का? चीन बरोबर जवळीक निर्माण झाली पाहिजे मात्र चीन चा ईतिहासील कटु अनुभव देखील विसरता येणार नाही.

भारतासारख्या देशातुन निर्यात कमी आणि आयात जास्त होणे हे परवडणारे नाही. जागतिक व्यापार संघटना, नाटो, आयएम एफ, डब्लुएचओ, सार्क सारख्या संघटना निष्प्रभ ठरत आहेत, अशा पार्श्वभूमीवर झालेल्या ब्रिक्स संमेलनाचे फलित आणि भारताचे हित काय हे भविष्यातच ठरेल.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# वलनी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका चारूलता बिजवे 'उत्कृष्ट मुख्याध्यापक' पुरस्काराने सन्मानित



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल वलनी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालच्या मुख्याध्यापिका चारूलता रवींद्र बिजवे यांना यंदाचा राज्यस्तरीय उत्कृष्ट मुख्याध्यापक सन्मान २०२६ प्रदान करण्यात आला. विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ, गोविंदराव वंजारी फाउंडेशन आणि गोविंद मैना फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, माजी आमदार स्वर्गीय ना.बा.सपाटे व स्वर्गीय दत्तात्रय मिरझापुरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ या 'सन्मान कर्तृत्वाचा' सोहळ्याचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.मुख्याध्यापक पदावरील २७ वर्षांचा प्रदीर्घ व विक्रमी कार्यकाळ, शैक्षणिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदान आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवलेले उपक्रम या सर्व बाबींची दखल घेत चारूलता बिजवे यांची या मानाच्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.सोहळ्यात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बिजवे यांना शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि पुस्तके देऊन गौरविण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी शिक्षक आंदरचसुधाकर अडबाले, पदवीधर आमदार अभिजित वंजारी, माजी आमदार डायगाव्हाने, डॉ. बबनराव तायवाडे याशिवाय शिक्षण, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेक गणमान्य व्यक्तीं उपस्थित होते.मुख्याध्यापिका चारूलता बिजवे यांना मिळालेल्या या गौरवपूर्ण सन्मानाबद्दल वलनी हायस्कूलचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, संस्थाचालक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी तसेच नागपूर जिल्ह्यातील शैक्षणिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# मुख्य अभियंता भूषण शिंदे यांची पॉवर फ्रंट संघटनेने घेतली सदिच्छा भेट



## शाल व वृक्षरोप देऊन स्वागत

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** औष्णिक वीज महानिर्मिती केंद्र खापरखेडा येथे नव्याने नियुक्त झालेले मुख्य अभियंता भूषण शिंदे यांची पॉवर फ्रंट कंत्राटी कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच सदिच्छा भेट घेतली. यावेळी संघटनेतर्फे वृक्षरोप व शाल देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

या भेटी दरम्यान कंत्राटी कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांचे निवेदन मुख्य अभियंत्यांना देण्यात आले. यावर सकारात्मक चर्चा झाली. औष्णिक वीज केंद्रातील सर्व कंत्राटी कामगारांना दरमहा ७ ते १० तारखेच्या आत वेतन मिळावे, यासाठी मुख्य अभियंत्यांच्या स्वाक्षरीने परिपत्रक काढावे आणि वेळेत वेतन न देणाऱ्या कंत्राटदारांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. याबाबत कल्याण अधिकारी आनंद वाघमारे यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या. तसेच कोल सॅम्पलिंग व जलशुद्धीकरण प्रकल्पातील कंत्राटी कामगारांच्या मूळ वेतनात १९ टक्के वाढ व १९ टक्के थकबाकी (एरियस) देण्याची मागणी करण्यात आली. हा लाभ कामगारांना लवकर मिळावा, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कंत्राट संपलेल्या कंत्राटदारांबाबतही लवकर कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

O/S-II येथील कंत्राटी महिला कामगारांना मागील एक ते दोन वर्षांपासून तात्पुरते गेटपास दिले जात असल्याचा मुद्दा संघटनेने मांडला. संबंधित कामगारांना कायमस्वरूपी गेटपास देण्यासाठी पुढील प्रक्रिया सुरू करण्याची सूचना मुख्य अभियंत्यांनी अधिकाऱ्यांना केली. कामगारांच्या विविध प्रश्नांवर मुख्य अभियंत्यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याने प्रलंबित मागण्या मार्गी लागण्याची अपेक्षा संघटनेने व्यक्त केली. यावेळी कल्याण अधिकारी आनंद वाघमारे, पॉवर फ्रंट कंत्राटी कामगार संघटनेचे राज्य सचिव रोशन गोस्वामी, विदर्भ अध्यक्ष भूपेंद्र चतुर्वेदी, शाखाध्यक्ष प्रवीण हाते, कोषाध्यक्ष अनिल बोरकडे, सचिव अभय गिरी, उपाध्यक्ष उमेश काळे, सुमेध चव्हाण, सहसचिव दिलीप गावंडे, नरेश डोंगरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# श्री केदारेश्वर महादेव मंदिर येथे किर्तन, महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१५,बिलोली (नांदेड) :** सगरोळी येथील प्रसिद्ध ग्रामदैवत श्री केदारेश्वर महादेव मंदिरात श्रावण मास निमित्त खंदारे /गिरगांवकर परिवाराच्या वतीने आयोजित किर्तन व महाप्रसादाचा कार्यक्रम आनेक मान्यवर भक्तांच्या प्रमुख उपस्थित मोठ्या भक्तीमय वातावरणात उत्साहत संपन्न झाला. सगरोळी गावच्या मध्यभागी तलावाच्या काठावर पुरात्तन काळा पासुन आसतीत्वात आसलेल श्री केदारेश्वर महादेव मंदीर हे सगरोळीच ग्रामदैवत परीसरात प्रसिद्ध आसुन श्रावणमासाचे औचित्य साधुन सगरोळी येथील सेवानिवृत विशेष कार्य अधिकारी मधु गिरगावकर यांच्या भगिनी सेवानिवृत्त महीला व बालकल्याण अधिकारी गंगामणी गिरगांवकर / खंदारे यांच्या वतीने किर्तन व महाप्रसादाच्या आयोजित कार्यक्रम नुकतच मोठया भक्तीमय वातावरणात संपन्न झाल. नवसाला पावणा-या या ग्राम दैवताच्या आशिर्वादामुळे गिरगावकर परीवारातील बंधु शासकीय सेवेत विविध उच्च पदावर यशस्वी काम करून नाव लौकिक प्राप्त केले. गिरगांवकर परिवाराच्या या यशात श्री केदारेश्वर महादेव मंदिराचे आशीर्वाद आमच्या पाठीशी असल्यामुळेच आमचा परिवार सुखी-समाधानी आसल्याच्या भावना व्यक्त करत मधुजी गिरगावकर यानी उपस्थित भक्ताचे आभार मानले. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर, देविदास देशमुख, सुनिलराव देशमुख, रोहित देशमुख, अशोक पा. खिरप्पवार, संग्राम पा.हायगले, विश्वनाथ पाटील समन, एस. कुमार,विजयकुमार कुंचनवार, भीमराव जेठे,राजु पा. शिंपाळकर, शंकर मावलगे,शंकर महाजन, बाबाराव रोकडे, शिवकुमार पाटील बामणे,भगवान मोरे,लक्ष्मण शेट्टीवार, सुनील यंबडवार मुन्ना पोवाडे यांच्यासह अनेक मान्यवर भक्त मंडळी मोठ्या संख्येनी उपस्थित राहून कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.

# जिंतूरात पावसासाठी मुस्लिम बांधवांचे अल्लाहकडे साकडे

## हजरत शमशुद्दीन ईदगाह मैदानावर नमाज-ए-इस्तिस्का; सलग तीन दिवस सामूहिक दुआ



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१५, जिंतूर (परभणी) :** महाराष्ट्राच्या अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत आहे. खरीप हंगामातील पिके पावसाच्या प्रतीक्षेत असताना शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत. पावसाअभावी शेतकऱ्यांवर निर्माण झालेल्या संकटातून सुटका व्हावी, शेतीला पाणी मिळावे आणि सर्वत्र समाधानकारक पाऊस पडावा, यासाठी जिंतूर शहरातील मुस्लिम बांधवांनी अल्लाहकडे साकडे घातले.

मंगळवार, दि. १५ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता हजरत शमशुद्दीन ईदगाह मैदानावर नमाज-ए-इस्तिस्का अदा करण्यात आली. नमाज पठणानंतर मोठ्या संख्येने उपस्थित मुस्लिम बांधवांनी सामूहिक दुआ केली. महाराष्ट्रातील शेतकरी संकटातून बाहेर यावा, पिकांना जीवदान मिळावे आणि पावसाचे आगमन व्हावे, अशी आर्त प्रार्थना करण्यात आली. विशेष म्हणजे आजपासून सलग तीन दिवस नमाज-ए-इस्तिस्का व सामूहिक दुआ करण्यात येणार आहे.

**शेतकऱ्याच्या वेदनेशी धर्माची सीमा नाही**

पावसाची प्रतीक्षा केवळ शेतकऱ्यालाच नसते. शेतीवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संपूर्ण समाजाचे अर्थचक्र अवलंबून असते. शेतकऱ्याच्या शेतात धान्य पिकले तर बाजारपेठ चालते, व्यापारी चालतो, कामगाराला रोजगार मिळतो आणि सामान्य नागरिकाच्या घरातील चूल पेटते. त्यामुळे शेतकऱ्याचे संकट हे कोणत्याही एका जाती-धर्माचे संकट नसून संपूर्ण समाजाचे संकट आहे. जिंतूरमधील मुस्लिम बांधवांनी केलेली पावसासाठीची दुआ याच सामाजिक जाणीवेचे दर्शन घडवणारी आहे. प्रत्येक मुस्लिम व्यक्तीकडे शेती असेलच असे नाही. अनेकांकडे एक गुंठाही शेती नसते; मात्र शेतकरी सुखी असेल तरच समाज सुखी राहू शकतो, याची जाणीव या उपक्रमातून दिसून येते.

माझ्याकडे शेती नाही, पण शेतकऱ्याची चिंता आहे. आज प्रत्येक मुस्लिम व्यक्ती शेतकरी नाही. मात्र शेतकरी सुखी असणे ही प्रत्येक नागरिकाची गरज आहे. माझ्याकडे एक गुंठाही शेती नाही, तरी शेतकरी संकटात असल्याची जाणीव आहे, ही भावना या उपक्रमामागील सामाजिक वास्तव अधोरेखित करते. कारण शेतकरी फक्त स्वतःच्या कुटुंबासाठी अन्न पिकवत नाही. तो संपूर्ण समाजासाठी अन्न निर्माण करतो. त्यामुळे शेतकऱ्याच्या शेतात पाऊस पडणे म्हणजे एका कुटुंबाचे नव्हे, तर हजारो कुटुंबांच्या भविष्याचे संरक्षण होणे होय.

**मुस्लिम समाजाच्या प्रार्थनेतून सर्व समाजासाठी संदेश**

इस्लामच्या धार्मिक परंपरेमध्ये पाऊस न पडल्यास नमाज-ए-इस्तिस्का अदा करून अल्लाहकडे पावसासाठी प्रार्थना करण्याची पद्धत आहे.

पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या काळापासून ही परंपरा असल्याचे मुस्लिम धर्मीय मानतात. पावसाची गरज निर्माण झाल्यास शहराबाहेर किंवा मोकळ्या मैदानावर एकत्र येऊन नमाज अदा करून दुआ केली जाते. जिंतूरमध्येही याच धार्मिक परंपरेनुसार सामूहिक नमाज व दुआ करण्यात आली. ईदगाह मैदानावर झालेल्या या उपक्रमातून धार्मिक श्रद्धेसोबतच शेतकऱ्यांप्रती असलेली संवेदनाही व्यक्त झाली.

**धर्म वेगळा असला तरी संकट एकच**

महाराष्ट्रात पावसासाठी विविध समाजातील नागरिक आपल्या-आपल्या श्रद्धेनुसार प्रार्थना करीत आहेत. कुठे धार्मिक विधी होत आहेत, कुठे दुआ केली जात आहे, तर कुठे देव-देवतांकडे साकडे घातले जात आहे. या सर्व प्रयत्नांचा केंद्रबिंदू एकच आहे. निसर्गाने साथ द्यावी. अशा परिस्थितीत हिंदू-मुस्लिम समाजामध्ये गैरसमज निर्माण करण्यापेक्षा एकमेकांच्या श्रद्धेचा आदर करण्याची गरज आहे. मुस्लिम समाज दुआ करीत असेल तर हिंदू समाजानेही त्याकडे शेतकऱ्यासाठी केली जाणारी प्रार्थना म्हणून पाहावे आणि आपल्या पद्धतीने ईश्वराकडे पावसासाठी साकडे घालावे.

**जिंतूरचा उपक्रम राज्यासाठी ठरू शकतो संदेश**

जिंतूरमध्ये सुरू झालेला तीन दिवसीय नमाज-ए-इस्तिस्का उपक्रम केवळ एका धार्मिक कार्यक्रमापुरता मर्यादित न राहता शेतकरी वाचला तरच समाज वाचेल हा संदेश देणारा ठरत आहे.आज महाराष्ट्राला धार्मिक वादापेक्षा पाण्याची गरज आहे. शेतकऱ्याला राजकारणापेक्षा पिकाला पाणी मिळण्याची चिंता आहे. अशा वेळी कोणता समाज कोणत्या पद्धतीने प्रार्थना करतो, यापेक्षा सर्व समाज शेतकऱ्याच्या पाठीशी किती संवेदनशीलतेने उभा राहतो, हे अधिक महत्त्वाचे आहे.मुस्लिम समाज अल्लाहकडे दुआ करीत आहे; हिंदू समाज आपल्या श्रद्धेनुसार ईश्वराकडे प्रार्थना करू शकतो. श्रद्धेचे मार्ग वेगळे असले तरी शेतकऱ्यासाठीची भावना एकच आहे.

आज जिंतूरच्या ईदगाह मैदानावर उमटलेली ही दुआ केवळ पावसासाठी नव्हती; ती शेतकऱ्याच्या जगण्यासाठी होती.महाराष्ट्रातील गावागावांत सर्व समाजाने आपल्या-आपल्या श्रद्धेनुसार शेतकऱ्यासाठी प्रार्थना करावी, एकमेकांच्या धार्मिक भावनांचा आदर करावा आणि संकटाच्या काळात धर्माच्या भिंतींपलीकडे जाऊन माणुसकीला प्राधान्य द्यावे, हाच या उपक्रमाचा खरा संदेश आहे.

# चिचोली, भानेगाव, चनकापूर ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

## संयुक्त नगरपरिषदेच्या स्थापनेवर प्रश्नचिन्ह ?




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** चिचोली, भानेगाव आणि चनकापूर या तीन ग्राम पंचायतींचे विलीनीकरण करून संयुक्त नगरपरिषद स्थापन करण्याचा बहुचर्चित प्रस्ताव नगरविकास मंत्रालयात अडकला आहे तर दुसरीकडे ८ सप्टेंबर २०२६ मंगळवारला या तीनही ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांचे आरक्षण जाहीर झाले आहे त्यामुळे प्रस्तावित नगरपरिषदेच्या निर्मितीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून परिसरात आता पुन्हा एकदा ग्रामपंचायत निवडणुकीचे ढोल-ताशे वाजण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

राज्याचे महसूलमंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी या भागाच्या विकास करण्याच्या दृष्टीकोनातून संयुक्त नगरपरिषद करण्याचे आश्वासन दिले होते त्यानुसार जिल्हाधिकाऱ्या मार्फत ५ मे २०२५ रोजी हा प्रस्ताव नगरविकास मंत्रालयाकडे सादर करण्यात आला होता परंतु सदर प्रस्ताव थंडबस्त्यात पडल्याने राजकीय पेच निर्माण झाला आहे. यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे विलास महल्ले यांनी याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयाने ८ ऑक्टोबर २०२५ रोजी नगरविकास मंत्रालयाला महल्ले यांच्या अर्जावर आठ आठवड्यांच्या आत निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. मात्र मुदत संपून महिने उलटले तरी नगरविकास मंत्रालयाने याबाबत कोणताही अंतिम निर्णय घेतला नाही.

यादरम्यान निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत निवडणुकांच्या बाबत निर्णय घेतला ८ सप्टेंबर २०२६ मंगळवार रोजी सरपंच पदाचे आरक्षण जाहिर करण्यात आले चिचोली व भानेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच पद अनुसूचित जमाती (खुला) प्रवर्गासाठी तर चनकापूरचे सरपंच पद सर्वसाधारण गटासाठी आरक्षित करण्यात आले आहे. चनकापूर ग्रामपंचायत चा कार्यकाळ फेब्रुवारी २०२६ मध्ये संपला आहे याठिकाणी प्रशासकाला सहा महिन्या करिता मुदतवाढ देण्यात आली आहे तर चिचोली व भानेगावचा ग्राम पंचायत चा कार्यकाळ नोव्हेंबर २०२७ पर्यंत संपणार आहे त्यामुळे लवकरच ग्रामपंचायत निवडणुकांची घोषणा होण्याची शक्यता आहे.

सरपंच पदाचे आरक्षण जाहीर होताच चिचोली, भानेगाव, चनकापूर ग्राम पंचायत परिसरात राजकीय हालचालींना वेग आला आहे अनेक स्थानिक नेते, कार्यकर्ते गुडघ्याला बाशिंग बांधून मैदानात उतरले आहेत याबाबत सोशल मीडियावर जोरदार चर्चा आहे परंतु ऐन ग्रामपंचायत निवडणुकीच्या तोंडावर शासनाने संयुक्त नगरपरिषदेची घोषणा केली, तर या इच्छुकांच्या मेहनतीवर पूर्णपणे विरजन पडेल अशी भीती ही व्यक्त केली जात आहे.

**केंद्र सरकारच्या 'सीमा फ्रीज' नियमाचा मोठा फटका?**

जनगणनेच्या पार्श्वभूमीवर ३१ डिसेंबर २०२५ पूर्वी नवीन महसुली गावे, तालुके किंवा नगरपालिकांच्या सीमा निश्चित करण्याचे निर्देश केंद्र सरकारने राज्य व केंद्रीय शासित प्रदेशाना निर्देश दिले होते. ०१ जानेवारी २०२६ पासून देशभरातील प्रशासकीय सीमा 'फ्रीज' करण्यात आल्या असून ३१ मार्च २०२७ पर्यंत या सीमांमध्ये कोणताही बदल करता येणार नसल्याचे म्हटले आहे त्यामुळे कायदेशीरदृष्ट्या ३१ मार्च २०२७ पर्यंत तूर्तास तरी संयुक्त नगरपरिषदेच्या निर्मितीला पूर्णपणे ब्रेक लागल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# जलपर्णी निर्मूलनासाठी वडाळे तलावात ५० हजार जैविक कीटक सोडले

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, पनवेल (नवी मुंबई) :** पनवेल मधीलऐतिहासिक वडाळे तलावातील सॅल्विनिया मोलेस्टा (जलपर्णी) या समस्येवर शास्त्रीय, कायमस्वरूपी आणि पर्यावरणपूरक उपाय करण्यासाठी पनवेल महानगरपालिका आणि ICAR-IanVdma संशोधन संचालनालय, जबलपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जैविक नियंत्रणाची मोहीम राबविण्यात येत आहे. महापौर नितीन पाटील आणि आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार सुरू असलेल्या या मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात आणखी ५० हजार 'सायर्टोबॅगस साल्विनी' (Cyrtobagous salviniae) या जैविक नियंत्रण करणाऱ्या कीटकांना तलावात सोडण्यात आले.यापूर्वी पहिल्या टप्प्यात २० हजार सायर्टोबॅगस साल्विनी कीटक तलावात सोडण्यात आले होते. तलावातील अनुकूल वातावरणामुळे या कीटकांचे नैसर्गिक प्रजनन प्रभावीपणे झाल्याने त्यांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. हे कीटक प्रामुख्याने सॅल्विनिया जलपर्णीवरच उपजीविका करतात. त्यामुळे तलावातील इतर वनस्पती तसेच जलपरिसंस्थेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता कमी असून, दुसऱ्या टप्प्यातील ५० हजार कीटकांमुळे जलपर्णी नियंत्रणाला अधिक वेग मिळण्याची अपेक्षा आहे.

जैवविविधतेच्या संवर्धनाला हातभारजलपर्णीचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर तलावातील पाण्याचे अभिसरण सुधारण्यास मदत होणार असून, जलपरिसंस्थेतील नैसर्गिक संतुलन पुनर्स्थापित होण्यास हातभार लागणार आहे. तसेच स्थलांतरित पक्षी आणि इतर जलचरांसाठी अधिक अनुकूल अधिवास निर्माण होण्याची अपेक्षा आहे. यामुळे तलावाचे नैसर्गिक सौंदर्यही खुलणार असल्याची माहिती उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी दिली. रासायनिक उपायांऐवजी जैविक पद्धतीला प्राधान्यसॅल्विनिया मोलेस्टा ही दक्षिण अमेरिकेतील, विशेषतः ब्राझीलमधील मूळची पाण्यावर मुक्तपणे तरंगणारी जलवनस्पती आहे. तिच्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी जैविक पद्धतीचा अवलंब केल्याने रासायनिक उपायांवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होते. वडाळे तलावाच्या संवर्धनासाठी पनवेल महानगरपालिका आणि ICAR-IanVdma संशोधन संचालनालयाने हाती घेतलेला हा उपक्रम शास्त्रीय आणि पर्यावरणपूरक असून, जैवविविधतेच्या संरक्षणाला प्राधान्य देणारा ठरत आहे. जलपर्णी निर्मूलनाचे टप्पे ७ मे २०२६ रोजी सायर्टोबॅगस साल्विनी कीटक वडाळे तलावात सोडण्यात आले. त्यानंतर जलपर्णी पिवळसर व गर्द चॉकलेटी होण्यास सुरुवात होण्याचा अपेक्षित कालावधी ७ फेब्रुवारी २०२७ आहे. पुढील नऊ महिन्यांत जलपर्णी नष्ट होण्याचा अपेक्षित कालावधी ७ नोव्हेंबर २०२७ असा आहे.

# बिना(संगम) परिसरात बिबट्याचा धुमाकूळ कायम

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** बिना(संगम) परिसरात मागील तीन दिवसांपासून बिबट्याच्या दहशतीने नागरिक व शेतकरी कमालीचे दहशतीखाली आहेत बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी वनविभागाने लावलेला पिंजरा हुकवत बिबट्याने एका कोठाच्या भिंतीला भगदाड पाडून बकरीच्या पिल्लाची शिकार केली. शिवाय बकऱ्याच्या मानेला पंजा मारून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी १५ सप्टेंबर सकाळी उघडकीस आली असून वनविभागाच्या अपुऱ्या नियोजनामुळेच बिबट्या जाळ्यात अडकला नसल्याचा आरोप संतप्त गावकऱ्यांकडून केला जात आहे.



बिबट्याचा वाढता धोका लक्षात घेता १४ सप्टेंबरच्या रात्री सेमेनरी हिल्स वनपरिक्षेत्राच्या पथकाने बिना(संगम) शिवारात दोन पिंजरे लावले होते. यातील एक पिंजरा नसीर अजित खान यांच्या शेतात बसवण्यात आला होता. बिबट्याला आकर्षित करण्यासाठी पिंजऱ्यात बिबट्यानेच आधी शिकार केलेल्या गाईचे वासरू ठेवण्यात आले होते. मात्र, बिबट्याने पिंजऱ्यातील त्या मृत वासराकडे साधी नजरही टाकली नाही, उलट बिबट्याने रात्रीच्या सुमारास पिंजऱ्या जवळ असलेल्या कोठ्याच्या भिंतीला खड्डा पाडून एका बकरीच्या पिल्लाची शिकार केली. यावेळी कोठ्यात बांधून आलेल्या बकऱ्याच्या मानेवर पंजा मारून गंभीर जखमी केले.

> ● बिनासंगम ग्रामपंचायत सरपंच नारायण भडंग यांनी गावात दवंडी देऊन बिबट्याचा वावर असल्याने सायंकाळी ६ वाजेनंतर शेतात जाण्यास मनाई केली व गुरेढोरे शेतात बांधण्यास मनाई केली आहे.

मंगळवारी सकाळी घटना उघडकीस आल्यानंतर बिना(संगम) परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याला जाळ्यात ओढण्यासाठी पिंजऱ्यात ताजे मांस किंवा एखादा गाय बकरी ठेवणे अपेक्षित होते. मात्र, वनविभागाने आधीच शिकार केलेले आणि दुर्गंधी सुटलेले वासरू पिंजऱ्यात ठेवले. वासराचा कुजलेला वास आल्यानेच बिबट्याने पिंजऱ्याकडे पाठ फिरवली असण्याची दाट शक्यता जाणकारांनी व्यक्त केली आहे.

मागील तीन दिवसांपासून बिबट्या वावर असल्याने शेतकरी रात्री-अपरात्री शेतात जाण्यास घाबरत आहेत. वनविभागाने केवळ औपचारिक पिंजरे न लावता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, पिंजऱ्यात योग्य भक्ष्य ठेवून बिबट्याला त्वरित जेरबंद करावे अशी जोरदार मागणी बिनासंगम ग्रामस्थांनी केली आहे.

# गणेशोत्सव व इतर आगामी सणांमध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी बैठक

**अक्षराज : पुनम परदेशी**

**दि.१५, सोयगाव :** आगामी गणेशोत्सव व इतर सणांच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच उत्सव शांततेत व उत्साहात साजरे व्हावेत, यासाठी सिल्लोडचे पोलीस उपअधीक्षक विश्वजीत काइंगडे व ठाणेदार दिनकर गोरे यांनी सोयगाव, तेडका, बनोटी, बहुळखेडा इत्यादी गावांमध्ये ग्रामस्थ व गणेश मंडळांच्या बैठका घेतल्या.

प्रत्येक बैठकीमध्ये ग्रामस्थांना आपली बाजू मांडण्याची तसेच स्थानिक समस्या व अडचणी मांडण्याची पूर्ण संधी देण्यात आली. बहुतांश बैठकींमध्ये गणेश मंडळांकडून स्पीकर अथवा डीजे लावण्याची परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. या मागण्यांवर पोलीस प्रशासनाकडून ध्वनीप्रदूषणाचे नियम व त्याचे उल्लंघन केल्यास होणारे कायदेशीर परिणाम मुद्देसूदपणे समजावून सांगण्यात आले. त्याचबरोबर मोठ्या आवाजातील डीजे व स्पीकरमुळे नागरिकांच्या आरोग्यावर, विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले व आजारी व्यक्तींवर होणारे दुष्परिणाम याबाबतही ग्रामस्थांना माहिती देण्यात आली.

या संवादाचा सकारात्मक परिणाम दिसून आला. प्रत्येक बैठकीच्या शेवटी ग्रामस्थ व गणेश मंडळांनी डीजे न लावण्याचा स्वयंस्फूर्त निर्धार व्यक्त केला. नुकत्याच गणेश चतुर्थीच्या दिवशी झालेल्या गणेश आगमन मिरवणुकांमध्ये सोयगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील प्रत्येक गावात ग्रामस्थांनी या निर्धाराचे तंतोतंत पालन केल्याचे दिसून आले. विशेष म्हणजे, कोठेही



ध्वनीमर्यादेचे उल्लंघन झाल्याची तक्रार अथवा नोंद आढळून आली नाही.

यापुढील दहा दिवस तसेच गणेश विसर्जनाच्या दिवशीही याच पद्धतीने शांततापूर्ण व नियमांचे पालन करणारा उत्सव साजरा करण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. पोलीस प्रशासनाकडूनही ग्रामस्थांच्या या सकारात्मक भूमिकेला पूर्ण सहकार्य देतानाच, आवश्यक त्या ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना व गरज भासल्यास कायदेशीर कारवाई करण्याची पूर्ण तयारी ठेवण्यात आली आहे.

संवादातून सहकार्य, सहकार्यातून स्वयंशिस्त आणि स्वयंशिस्तीतून शांततापूर्ण उत्सव सोयगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत यंदाच्या गणेशोत्सवाची हीच दिशा दिसून येत आहे.

# १० वर्षे झाली तरी जिंतूर-परभणी महामार्गाचे काम अपूर्ण अर्धवट काम, निकृष्ट दर्जाचा आरोप

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.१५, जिंतूर (परभणी) :** जिंतूर ते परभणी महामार्गाचे काम गेल्या जवळपास दहा वर्षांपासून सुरू असून, अद्यापही या मार्गाचे काम पूर्णत्वास गेलेले नाही. अनेक ठिकाणी रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत आहे. त्यामुळे वाहनचालकांसह प्रवाशांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.



महामार्गाच्या कामाबाबत नागरिकांकडून निकृष्ट दर्जाच्या कामाचा आरोप केला जात असून, मोठ्या प्रमाणात निधी खर्च होऊनही अपेक्षित दर्जाच्या सुविधा प्रत्यक्षात दिसत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.महामार्गावर उभारण्यात आलेली स्ट्रीट लाईटची व्यवस्था अनेक ठिकाणी पूर्णपणे सुरू नसून, काही ठिकाणी लाईट केवळ नावालाच असल्याचे चित्र आहे. रात्रीच्या वेळी या मार्गावर अंधाराचे साम्राज्य निर्माण होत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.तसेच काही गावांमध्ये प्रवाशांसाठी उभारण्यात आलेली बसस्थानके सध्या पडझडीच्या अवस्थेत आहेत. ज्या सुविधांसाठी शासनाचा निधी खर्च करण्यात आला, त्या सुविधांची देखभाल होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप आहे.

बोरी चांदज कोक यांसह महामार्गालगतच्या गावांमध्ये रस्ते, पथदिवे, बसस्थानके आणि इतर मूलभूत सुविधांची अवस्था पाहता विकासकामांचा दर्जा आणि देखरेख यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.दहा वर्षांचा कालावधी उलटूनही महामार्गाचे काम पूर्ण होत नसेल, तर या कामाची गुणवत्ता, खर्च, ठेकेदाराची जबाबदारी आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या देखरेखीची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.महामार्गावर कोट्यवधी रुपयांचा खर्च झाल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात नागरिकांना अपेक्षित सुविधा मिळत नसतील, तर विकासकामे प्रत्यक्षात झाली की केवळ कागदावर? असा सवाल उपस्थित होत आहे.

संबंधित विभागाने तातडीने संपूर्ण जिंतूर-परभणी महामार्गाची पाहणी करून अर्धवट कामे पूर्ण करावीत, निकृष्ट कामांची चौकशी करावी, बंद असलेल्या स्ट्रीट लाईट सुरू कराव्यात आणि पडझड झालेल्या बसस्थानकांची दुरुस्ती करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# खार्डी गणेश घाट ३ महिन्यातच उखडला !

## मनसेचे सचिव शरद पाटील यांनी पोस्ट करताच महापालिका खडबडून जागी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१४, दिवा (ठाणे) :** शिळ-दिवा: खार्डी येथील गणेश विसर्जन घाटाचे ₹५६ लाखांचे काम निकृष्ट निघाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ३ महिन्यांपूर्वी बांधलेल्या घाटाच्या लाद्या पूर्णपणे उखडल्या आहेत.

मनसे कल्याण ग्रामीण विधानसभा सचिव शरद गुणाजी पाटील यांनी आज दि. १४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता





हा प्रकार उजेडात आणला. त्यांच्या ट्विटनंतर अवघ्या ३० मिनिटांत प्रशासनाने दखल घेऊन दुरुस्तीचे काम सुरू केले.

हा जनतेच्या घामाच्या पैशाचा अपव्यय आहे. या प्रकरणी ठेकेदारावर कडक कारवाई करून त्याला काळ्या यादीत टाकावे आणि संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी शरद पाटील यांनी केली आहे.

# थोडक्यात बातम्या

## आझाद क्रांती सेनेच्या उदगीर-जळकोट विधानसभा प्रमुखपदी किरण सूर्यवंशी गुडसूरकर यांची नियुक्ती



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.१५, उदगीर (लातुर) :** उदगीर येथील शासकीय विश्रामगृहात आझाद क्रांती सेनेच्या वतीने सामाजिक विषयांवर विशेष चर्चा बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस उदगीर, जळकोट व अहमदपूर तालुक्यातील सामाजिक क्षेत्रात कार्यरत प्रमुख कार्यकर्ते व समाजबांधव उपस्थित होते. बैठकीदरम्यान समाजातील विविध अडचणी, सामाजिक प्रश्न तसेच त्यावर संघटितपणे काम करण्याच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख माननीय राजेश भाऊ घोडे यांच्या विचारांचा धागा पुढे नेत सामाजिक प्रश्नांसाठी संघटनेच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यावेळी किरण सूर्यवंशी गुडसूरकर यांची आझाद क्रांती सेनेच्या उदगीर-जळकोट विधानसभा प्रमखपदी जबाबदारी सोपविण्यात आली.

## गणेशोत्सवात पालशेतकरांची पाण्यासाठी पायपीट





**अक्षराज : उदय दणदणे**

**दि. १५, पालशेत (गुहागर) :** गुहागर तालुक्यातील पालशेत-निवोशी ग्रामपंचायत हद्दीतील जोईलवाडी येथे गेले आठ दिवस ग्रामपंचायतीचा नळ पाणी पुरवठा पूर्णपणे बंद असल्याने ग्रामस्थांचे प्रचंड हाल होत आहेत. ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर पाणी बंद झाल्याने सणाच्या आनंदाला गालबोट लागले असून, मुंबई-पुण्याहून सणासाठी गावी आलेल्या चाकरमान्यांनाही पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे.

या गंभीर समस्येबाबत जोईलवाडी ग्रामस्थ मंडळाने आज, मंगळवार दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी ग्रामपंचायत पालशेत-निवोशी कार्यालयात सरपंच / ग्रामविकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार देऊन पाणी पुरवठा तातडीने सुरू करण्याची मागणी केली आहे.

**महिलांना मैलो पायपीट**

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आठ दिवसांपासून नळाला पाणीच येत नाही आणि ग्रामपंचायतीकडून कोणतीही पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे विशेषतः महिला वर्गाला मैलो दूर पायी जाऊन डोक्यावरून पाणी आणावे लागत आहे.

**पाणीपट्टी वाढवली, पण पाणीच नाही!**

ग्रामस्थांच्या संतापाचे दुसरे कारण म्हणजे याच वर्षापासून ग्रामपंचायतीने पाणीपट्टीत मोठी वाढ केली आहे. नागरिक वेळेवर कर भरायला तयार असताना, ऐन सणासुदीला पिण्याच्या पाण्यासारखी मूलभूत गरजच भागत नसेल तर वाढीव पाणीपट्टीचा अर्थ काय? असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. या कारभाराविरोधात महिला वर्गात तीव्र नाराजी असून, प्रशासनाचे ढिसाळ नियोजन चव्हाट्यावर आले आहे.

**प्रशासन देणार का दिलासा?**

ही संवेदनशील समस्या तातडीने मार्गी लावून पर्यायी व्यवस्था उपलब्ध कराव्यात अशी मागणी होत आहे. या तक्रारीनंतर प्रशासन काय दखल घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## फ्रिजचा भीषण स्फोट, एकाच कुटुंबातील चौघांचा शेवट



**दि. १५, बंगळुरू :** घरातल्या फ्रिजचा स्फोट झाल्यानं एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या स्फोटात दोन जण गंभीर जखमी झाले आहे. सोमवारी रात्रीच्या सुमारास कर्नाटकच्या बेळगावात ही दुर्घटना घडली. या घटनेची माहिती पोलिसांकडून मंगळवारी देण्यात आली.

भारती धमोने (५०), शारदा धमोने (४५), गंगा धमोने (२५) आणि प्रिया धमोने (२४) यांचा फ्रिजच्या स्फोटात जागीच मृत्यू झाला. तर गजानन धमोने (६५) आणि रोशन धमोने (२१) गंभीररित्या भाजले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शारदा या गजानन यांच्या पत्नी होत्या. तर भारती त्यांची बहीण होती. प्रिया आणि गंगा या गजानन आणि शारदा यांच्या लेकी होत्या. तर रोशन त्यांचा लेक आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घरात असलेल्या फ्रिजचा स्फोट झाल्यानं आग लागली. बघता-बघता संपूर्ण घरात आगीच्या ज्वाळा पसरल्या. त्यामुळे कुटुंबातील सदस्य आतच अडकले. धमोने कुटुंबाच्या घरी सोमवारी गणरायाचं आगमन झालं होतं. रात्री जेवल्यावर संपूर्ण कुटुंब झोपलं.

धमोने कुटुंबाच्या शेजाऱ्यांनी मध्यरात्री सव्वा दोनच्या सुमारास स्फोटाचा मोठ्ठा आवाज ऐकला. शेजारीपाजारी मदतीसाठी धावले. गजानन आणि रोशन यांना बाहेर काढण्यात त्यांना यश आलं. पण अन्य चार सदस्यांचा आगीत मृत्यू झाला. गजानन आणि रोशन आगीत ६० टक्के भाजले आहेत.

धमोने यांच्या घराचा पत्रा स्फोटामुळे मोडला आहे. बहुतांश मौल्यवान वस्तू जळून गेल्या आहेत. फ्रिजच्या स्फोटामुळे दुर्घटना घडल्याचं एका पोलीस अधिकाऱ्यानं सांगितलं. स्फोट कशामुळे झाला, याचा शोध घेतला जात आहे. घरात आणलेल्या गणपतीच्या मूर्तीभोवती लाईट्स लावण्यात आल्या होत्या. त्यामुळे पोलिसांना शॉर्ट सर्किट झाल्याची शक्यता वाढते.